**कृपया प्रसिध्दीसाठी -** **10 ऑक्टोबर 2009**

## ‘मनसे’च्या शिरीष पारकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल

**मुंबई, शनिवार :** मनसेच्या श्री. शिरीष पारकर यांनी भाजपा नेते श्री. राम नाईक यांच्याबाबत ‘आयबीएन लोकमत’वरुन केलेल्या निखालस खोट्या विधानांची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली असून श्री. पारकर यांच्या विरोधात दखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

मनसेचे प्रवक्ता व विलेपार्ले विधानसभेचे उमेदवार श्री. शिरीष पारकर यांनी ‘आयबीएन लोकमत’च्या ‘आजचा सवाल’ कार्यक्रमात बोलत असताना दर तीन महिन्यांनी श्री. राम नाईक यांचे रक्त बदलावे लागते, तसेच श्री. राम नाईक ‘मराठी द्वेष्टे ’ आहेत अशी विधाने केली. श्री. शिरीष पारकर यांनी इतक्या हीन पातळीवर उतरुन केलेल्या विधानांमुळे भाजपा कार्यकर्ते व श्री. राम नाईक यांचे चाहते व्यथित झाले. तरीही श्री. राम नाईक यांनी संयम बाळगून श्री . शिरीष पारकर यांच्या विरुध्द निवडणूक आयोगाकडे तक्रार केली.

निवडणुकीच्या रिंगणतील उमेदवाराने व्यक्तिगत व खोटे आरोप वा विधाने करु नयेत असे निवडणूक आचार संहितेत स्पष्टपणे म्हटले असतानाही श्री. पारकर यांनी ही विधाने केली आहेत. विशेषतः संपूर्ण आयुष्यात कधीही श्री. राम नाईक यांच्यावर रक्त बदलण्याची वेळ आली नसतानाही श्री. पारकर यांनी अशी विधाने करावीत हे अत्यंत खेदजनक तसेच हीन अभिरुचीचे होते. भरीतभर म्हणून आयुष्यभर समाजातील सर्वांना बरोबर घेऊन सार्वजनिक काम करणा-या श्री. राम नाईक यांना त्यांनी मराठी द्वेष्टेही म्हटले. त्यामुळेच श्री. पारकर यांच्याविरोधात आचार संहिता भंग केल्याची तक्रार श्री. राम नाईक यांनी 2 ऑक्टोबर रोजी नोंदविली होती. नंतर पुराव्यादाखल कार्यक्रमाची सीडीही श्री. राम नाईक यांनी निवडणूक आयोगाला दिली.

सदर तक्राराची गंभीर दखल घेऊन विलेपार्ले विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी श्री. तानाजी शिंदे यांनी विलेपार्ले पोलीस ठाण्यास कायदेशीर कारवाईचे आदेश दिले होते. या आदेशानुसार विलेपार्ले पोलीस ठाण्यामध्ये भारतीय दंड विधान कलम 188 अनुसार श्री. शिरीष पारकर यांच्या विरोधात दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर कलमानुसार श्री. शिरीष पारकर यांना एक महिन्याचा तुरुंगवास होऊ शकतो.

याबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री. राम नाईक म्हणाले,"निवडणुकीत एकमेकांविरुध्द लढत असताना किमान सभ्यता पाळली जावी अशी अपेक्षा असते. खरं तर या निवडणुकीत मी उमेदवारही नाही. तरीही या पातळीवर येऊन मनसेचे प्रवक्ते बोलतात. यातून सुजाण मतदार योग्य अर्थ काढतील." महाराष्ट्रात केवळ विद्वेषाची बीजे पेरणा-या मनसेचा पराभव करुन मतदारच चोख उत्तर देतील, असा विश्वासही श्री. राम नाईक यांनी व्यक्त केला.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न : निवडणूक निर्णय अधिका-यांचे पत्र**

# १६७ विलेपार्ले विधानसभा मतदारसंघाचे कार्यालय

न्यु एअर पोर्ट कॉलनी, कम्युनिटी हॉल, पश्चिम द्रुतगती मार्ग विलेपार्ले पूर्व
मुंबई ४०० ०९९ दूरध्वनी क्र.२८३८४४४२

क्र.निनिअ/१६७ विलेपार्ले/२
दिनांक: ०९.१०.२

प्रति
मा.श्री. राम नाईक
९, शिवस्मृती, ५१ जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई ४०० ०६३.

विषय: विलेपार्ले विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री. शिरीष पारकर यांच्याविरुध्द आचारसंहिता भंग केल्याबद्दलची तक्रार

संदर्भ: आपले २.१०.२००९ व ५.१०.२००९ चे पत्र

महोदय,

कृपया २ ऑक्टोबर व ५ ऑक्टोबर २००९ चे उपरोक्त विषयासंदर्भातील पत्र आपल्या तक्रारीनंतर श्री. शिरीष पारकर यांना पत्र लिहून त्यांचा लेखी खुलासा दि.३.१०. रोजी मागितला होता व तो दि.५.१०.२००९ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. दि.७.१०.२००९ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विलेपार्ले पोलीस ठाणे यांना प्रस्तुत वि अनुषंगाने निवडणूक कायद्याच्या तरतुदीनुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यास सां आले. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विलेपार्ले पोलीस ठाण्याने दि.९.१०.२००९ भा.द.वि. कलम १८८ अनुसार श्री शिरीष पारकर यांचे विरोधात केस नोंदविण्यात आली अ

आपल्या माहितीसाठी अग्रेषित.

कळावे,

(signature) ९/१०
निवडणूक निर्णय अधिकारी
१६७ विलेपार्ले विधानसभा मत

श्री. राम नाईक
का जनसंपर्क कार्यालय-मुंबई
10 OCT 2009
Office of
Shri Ram Naik - Mumbai